नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २७८ Issue - 278 | वार शुक्रवार दि. २७ फेब्रुवारी २०२६ Blow- Friday Date 27 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# जिल्हा परिषद अन् पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य; कॅबिनेट बैठकीत शिक्कामोर्तब



## निवडणूक लढविण्याची क्षमता नसलेल्यांना संधी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: राज्यातील महापालिका आणि नगरपालिका निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर तेथे स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्यात आली आहे. संख्याबळाच्या आधारावर पक्षांना हे स्वीकृत नगरसेवकपद मिळाले आहेत. त्यातच, नुकतेच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकाही पार पडल्या असून आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य असणार आहेत.

राज्य मंत्रिमंडळात या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याची सूत्रांची माहिती आहे. जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे २० टक्के सदस्य निवडता येणार असल्याची माहिती आहे.

राज्य मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे २० टक्के सदस्य निवडता येणार असल्याची माहिती आहे. किमान ५ सदस्य निवडणे बंधनकारक असणार आहे. यासंदर्भात लवकरच विधिमंडळात कायदा पारीत केला जाणार असल्याची माहिती आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वीकृत सदस्यसंदर्भात मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली होती. ग्रामीण राजकारणाच्या दृष्टीने सरकारचा हा महत्त्वाचा निर्णय आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतर्गत जिल्हा परिषदेत ५ आणि पंचायत समितीमध्ये २ सदस्यांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करण्यात यावी, अशी मागणी यापूर्वीच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. मुख्यमंत्र्यांनी या विषयावर सकारात्मक प्रतिसाद देत ग्राम विकास विभागाला कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार, आता राज्य मंत्रिमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती आहे.

ग्रामीण भागात समाजाभिमुख कार्य करणाऱ्या, परंतु निवडणूक लढविण्याची क्षमता नसलेल्या पात्र कार्यकर्त्यांना विकास प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध होईल,या उद्देशाने महायुती सरकारने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे, आता इच्छुक कार्यकर्त्यांना जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सभागृहात बसण्याची संधी मिळणार असल्याचे निश्चित झालं आहे.

# सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : अजित पवार यांच्या जाण्याने नुकसान झालं. अजित पवारांमुळे राज्यात आणि देशात आपली ओळख निर्माण झाली होती, सामान्य कुटुंबातून ते आले होते. २०२३ मध्ये अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष झाले, हे सांगण्यात मला कोणतीही अडचण नाही, असे म्हणत राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी अजित पवारांच्या आठवणींना उजाळा दिला. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्षाच्या बैठकीत सुनेत्रा पवारच राष्ट्रीय अध्यक्ष असल्याची घोषणाही करण्यात आली आहे.

पटेल यांनी पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीत याबाबतचा प्रस्ताव मांडला, त्याच सर्वानुमते सहमती दर्शवण्यात आली. दरम्यान, पार्थ पवार यांच्याकडेही मोठी जबाबदारी देण्यात येणार असल्याची माहिती आहे.

अजित दादा २८ जानेवारी दिवशी आपल्यातून निघून गेले, आपल्या सर्वांसाठी ते धक्कादायक होतं. आपल्या सर्वांना प्रश्न होता उद्या आपण काय करणार, कसं करणार? पण सुनेत्राताईंच्या नेतृत्वात आपला पक्ष काम करेल, असे प्रफुल पटेल यांनी म्हटले. दरम्यान, राष्ट्रवादीच्या बैठकीसाठी सुनेत्रा पवार, सुनील तटकरे, प्रफुल पटेल, पार्थ पवार, रुपाली चाकणकर छगन भुजबळ यांच्यासह अनेक नेते व पदाधिकारी उपस्थित होते.

मागच्या महिन्यात आपण पाहिलं की, काहीजण बोलू लागले. आपल्या पक्षात काही संबंध नाही ते काहीही बोलायला लागले, आम्ही काय करायचं ते सांगायला लागले. पोटात एक आणि ओठात एक बोलू लागले. परंतु आपण सुनेत्रा पवारांना उपमुख्यमंत्री केलं. आपण योग्यवेळी योग्य निर्णय केला. आता, आपल्याला अजित पवारांच्या आदर्शावर पुढे जायचं आहे. आता आपण नव्या अध्यक्षांच्या नेतृत्वात आपली वाटचाल करणार आहोत. आपण सर्वजण याठिकाणी एकत्र आलो आहोत. सगळ्या प्रांतातील लोकं याठिकाणी आले आहेत, असे म्हणत प्रफुल पटेल यांनी सुनेत्रा पवारांच्या नावाची घोषणा केली.



अजित पवारांनी मला राष्ट्रीय कार्याध्यक्ष केलं होतं. त्यांनी माझ्यावर एवढा मोठा विश्वास टाकला होता. पक्ष महाराष्ट्र आणि देशाच्या हितासाठी आम्ही काम केलं.

# शासकीय बँक व्यवहारांमध्ये २ हजार २२० कोटींची फसवणूक, अनिल अंबानींच्या कंपनीवर आणखी एक गुन्हा दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : उद्योगपती अनिल अंबानी यांच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. अनिल अंबानी यांच्या रिलायन्स कम्युनिकेशन विरोधात सीबीआयनं आणखी एक गुन्हा दाखल केला आहे. शासकीय बँक व्यवहारांमध्ये २ हजार २२० कोटी रुपयांची फसवणूक केल्याबद्दल हा गुन्हा दाखल झाला असल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान आज दिवसभर अनिल अंबानींची एऊ कडून चौकशी करण्यात आली आहे.

दिवसेंदिवस उद्योगपती अनिल अंबानी यांच्या अडचणीत वाढ होताना दिसत आहे. एका बाजूला ईडीकडून त्यांची चौकशी सुरु असतानाच त्यांच्यावर आता सीबीआयनं आणखी एक गुन्हा दाखल केला आहे. त्यामुळं उद्योगपती अनिल अंबानी यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. रिलायन्स कम्युनिकेशन विरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शासकीय बँक व्यवहारांमध्ये २ हजार २२० कोटी रुपयांची फसवणूक केल्याबद्दल हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कालच अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) मनी लॉंड्रिंग प्रकरणात मोठी कारवाई केली आहे. त्यांचे मुंबईतील आलिशान निवासस्थान ॲबोड जप्त केले आहे. अधिकाऱ्यांच्या मते, ही मालमत्ता अंदाजे ३७१६.८३ कोटींची आहे. ही कारवाई मनी लॉंड्रिंग विरोधी कायद्यांतर्गत करण्यात आली. ईडीने या संदर्भात तात्पुरते जप्तीचे आदेश जारी केले आहेत. सूत्रांच्या मते, हा आदेश अलीकडेच जारी करण्यात आला आहे. हा खटला अनिल अंबानी यांच्या कंपनी रिलायन्स कम्युनिकेशन्स (आरकॉम) शी संबंधित एका कथित बँक फसवणुकीच्या प्रकरणाशी संबंधित आहे. मनी लॉंड्रिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पीएमएलए) ईडी या प्रकरणाची चौकशी करत आहे. ॲबोड पाली हिलमध्ये आहे. ॲबोड नावाची ही आलिशान इमारत मुंबईच्या पाली हिल परिसरात आहे. ६६ मीटर उंच, १७ मजली इमारत देशातील सर्वात महागड्या खाजगी मालमत्तांपैकी एक मानली जाते. ईडीच्या मते, अनिल अंबानी आणि त्यांच्या समूह कंपन्यांविरुद्ध आतापर्यंत एकूण जप्तीची कारवाई १५००० कोटींपेक्षा जास्त झाली आहे. या महिन्याच्या सुरुवातीला, सर्वोच्च न्यायालयाने ईडीला रिलायन्स कम्युनिकेशन्स, त्यांच्या मूळ कंपन्या आणि रिलायन्स समूहाचे अध्यक्ष अनिल अंबानी यांच्याविरुद्ध मोठ्या प्रमाणात बँक फसवणुकीच्या आरोपांची चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्याचे निर्देश दिले.

## ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था, दरवर्षी १० लाख रोजगार निर्मिती

## १३-१४ अब्ज डॉलर्स गुंतवणूक आणि वित्तीय शिस्तीचे लक्ष्य गाठण्याचा निर्धार

# पुढील काही वर्षात महाराष्ट्र जगातील १३ वी अर्थव्यवस्था होईल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**राज्यपालाच्या अभिभाषणावर मुख्यमंत्र्यांचे उत्तर**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई, दि. २६ : महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ट्रिलियन डॉलर करण्याचे लक्ष्य, दरवर्षी १० लाख रोजगारनिर्मिती, १३ ते १४ अब्ज डॉलर्स गुंतवणुकीचे उद्दिष्ट आणि वित्तीय तूट अडीच टक्क्यांच्या खाली आणण्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांच्या अभिभाषणावर उत्तर देताना व्यक्त केला.

राज्यपालांच्या अभिभाषणावर सदस्यांनी मांडलेल्या मुद्यांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर उत्तर दिले. भाषणाच्या सुरूवातीलाच मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवरायांनी आपल्याला जो महाराष्ट्र धर्म सांगितला तो आपण सगळे जाणतोच, मराठा तितुका मेळवावा, महाराष्ट्र धर्म वाढवावा, आहे तितुके जतन करावे, पुढे आणिक मेळवावे, महाराष्ट्र राज्य करावे जिकडे तिकडे, अशा पद्धतीने सगळ्या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राला पुढे नेण्याचा प्रयत्न आपण करत आहोत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राने जीडीपीच्या तुलनेत कर्जाचे प्रमाण देशात सर्वोत्तम पातळीवर ठेवले आहे. देशाच्या जीडीपीमध्ये २०२४-२५ मध्ये राज्याचा वाटा १३.८ टक्के झाला असून आता ती १४ टक्क्यांच्या जवळ जाईल, असा प्राथमिक अंदाज आहे. राज्याचे बजेट नव्हे, तर अर्थव्यवस्था ट्रिलियन डॉलरची करायची आहे. सध्या राज्याची अर्थव्यवस्था सुमारे ५१ लाख कोटी रुपयांची असून २०१२-१३ मध्ये ती १३ लाख कोटी होती. अवघ्या दहा वर्षांत ती तीनपट वाढली आहे. ६६० बिलियन अर्थ व्यवस्था असलेले महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. देशातील कोणतेही राज्य महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेच्या बरोबरीचे नसल्याचा दावा करत पुढील चार-पाच वर्षांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली नाही, तर महाराष्ट्र ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनेल आणि जगातील १३वी अर्थव्यवस्था ठरेल, सध्या महाराष्ट्राची अर्थव्यवस्था बेल्जियमच्या तोडीस तोड आहे,असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

**विकसित महाराष्ट्र : केवळ दस्तऐवज नव्हे, कृती आराखडा**

'विकसित महाराष्ट्र' हे केवळ पुस्तक नसून त्यावर मोठे काम झाले आहे. संसाधनांचे कार्यक्षम नियोजन करण्यासाठी 'व्हिजन मॅनेजमेंट यूनिट' स्थापन करण्यात आले आहे. राज्याच्या अमृत महोत्सवी वर्ष २०२९, २०३४ आणि २०४७ या टप्प्यांनुसार विकासाचे नियोजन केले आहे. अर्थव्यवस्थेची दिशा त्या दिशेने नेण्यासाठी रोडमॅप तयार केला आहे. हा रोडमॅप तयार करताना ३ लाख ८० हजार नागरिकांनी सहभाग घेतला आणि ७ लाखाहून अधिक नागरिकांनी सूचना केल्या. सर्वच क्षेत्रांना सामोरे ठेवून विकसित महाराष्ट्राचे चित्र तयार केले आहे. विकसित महाराष्ट्रासाठी प्रगतीशील, शाश्वतता, सर्वसमावेशकता आणि सुशासन ही चार उद्दिष्ट ठेवण्यात आल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**दावोस करार : अंमलबजावणीतही अग्रेसर**

दावोस येथे जागतिक अर्थव्यवस्था एकत्र येते, त्यामुळे तेथील करारांना विशेष महत्त्व असते. महाराष्ट्राचे महत्त्व तेथे वाढले आहे. थेट परकीय कंपन्या येत नसल्या तरी भारतीय कंपन्यांमध्ये परकीय भांडवल गुंतलेले असते आणि अशा कंपन्यांशी करार होतात, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

गुंतवणुकीच्या सायकलमध्ये करारापासून उत्पादनापर्यंत दोन ते सात वर्षे लागतात. २०२२ मधील ९८ टक्के, २०२३ मधील ८० टक्के, २०२४ मधील ७० टक्के आणि २०२५ मधील ८८ टक्के करार विविध टप्प्यांवर अंमलबजावणीत आहेत. २०२६ साठी ३१ लाख कोटींचे करार झाले असून त्यातील ६७ टक्के उद्योग विभागाचे, तर काही एमएमआरडीएचे आहेत. याशिवाय १० लाख कोटींचे करार प्रक्रियेत असून त्याबाबत लवकरच निर्णय होईल. १८ देशांतील कंपन्यांचा सहभाग असलेल्या या करारांमध्ये ८३ टक्के परकीय गुंतवणूक आहे. उत्तर महाराष्ट्रातील नंदूरबार जिल्ह्यासह उत्तर महाराष्ट्रातील सर्व जिल्हे तसेच राज्यातील सर्व भागांमध्ये गुंतवणूक आली आहे. थेट परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर




असून देशातील ३९ टक्के एफडीआय राज्यात येते. हे केवळ इरादे नसून आरबीआयच्या आकडेवारीनुसार प्रत्यक्ष गुंतवणूक आहे. दावोसमध्ये करार केलेल्या छत्रपती संभाजीनगरमध्ये जेएसडब्ल्यूचा इलेक्ट्रिकल वाहन उत्पादन प्रकल्पासंदर्भातील करार वेगाने अंमलात येत असून जूनमध्ये काम सुरू होईल. दावोसमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, डाटा सेंटर, चक्रिय अर्थव्यवस्था, शाश्वत विकास, कृषी तंत्रज्ञान, हरित ऊर्जा यासह अनेक क्षेत्रात गुंतवणूक आली आहे. मायक्रोसॉफ्ट, गुगल, यासारखे अनेक जागतिक पातळीवर कंपन्या गुंतवणूक करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**बेरोजगारी दर घटला; १.५ लाख सरकारी नियुक्त्यांचा टप्पा**

राज्यात बेरोजगारीचा दर ११ टक्क्यांपेक्षा जास्त कधीच नव्हता, असे स्पष्ट करून मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यातील बेरोजगारी दर २०२१-२२ मध्ये ४ टक्के, २०२२-२३ मध्ये ३.३ टक्के आणि २०२३-२४ मध्ये ३.१ टक्क्यांवर आला आहे. महायुती सरकार आल्यानंतर १,२०,४४९ जणांना सरकारी नोकऱ्या देण्यात आल्या असून पुढील दोन महिन्यांत हा आकडा दीड लाखांपर्यंत जाईल. दरवर्षी १० लाख रोजगारनिर्मितीचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे.

रोजगार निर्मितीसाठी राज्याने स्टार्टअप, उद्योजकता आणि नावीन्य धोरणाला मान्यता दिली असून १४६ हून अधिक उपक्रमांना चालना देण्यात आली आहे.

**गडचिरोलीची वाटचाल 'स्टील सिटी'च्या दिशेने**

गडचिरोलीतील गुंतवणुकीतून ७०,८९५ रोजगार निर्माण होणार आहेत. 'जल, जंगल आणि जमीन' या तत्वांवर विकास करताना ५ कोटी वृक्षलागवड हाती घेतली आहे. स्थानिक आदिवासी युवक-युवतींना रोजगारात प्राधान्य दिले जात आहे. आदिवासी मुलगी आज ट्रक चालवून ५३ हजार रुपये कमावत असल्याचे उदाहरण त्यांनी दिले. ४० आदिवासी विद्यार्थी ऑस्ट्रेलियातील जागतिक दर्जाच्या कर्टन विद्यापीठात मायनिंगचे प्रशिक्षण घेत असून गडचिरोलीला 'स्टील सिटी' बनवण्याचे काम सुरू असल्याचेही मुख्यमत्र्यांनी यावेळी सांगितले.

**महाराष्ट्र हे देशाचे स्टार्टअप कॅपिटल**

देशातील नोंदणी केलेल्या स्टार्टअपपैकी २० टक्के स्टार्टअप हे महाराष्ट्रातील आहेत. देशातील ११९ युनिकॉर्नपैकी २८ महाराष्ट्रात आहेत. देशाच्या २५ टक्के युनिकॉर्न हे महाराष्ट्रात आहेत. त्यामुळे आपले राज्य स्टार्टअप हब बनले असून 'स्टार्टअप कॅपिटल' म्हणून ओळख निर्माण झाली असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

**कुंभमेळा : श्रद्धा आणि शाश्वत विकास यांचा संगम**

कुंभमेळा ही 'इन्टॅन्जिबल फेथ' आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. विविध पंथ, जाती आणि धर्माचे लोक येथे एकत्र येतात. कुंभमेळ्यामुळे उत्तर प्रदेशचे जागतिक स्तरावर ब्रॅंडिंग झाले. आपल्यालाही नाशिक कुंभमेळ्यामध्ये महाराष्ट्राचे जागतिकस्तरावर ब्रॅंडिंग करायचे आहे. प्रयागराजमध्ये गुंतवणुकीपेक्षा अधिक परतावा मिळाल्याचे उदाहरण देत नाशिक परिसरात गोदावरी पूर्णपणे स्वच्छ करण्याचे, सांडपाणी नदीत न जाण्याचे, विमानतळ उभारणी व रस्ते विस्ताराचे काम हाती घेतले आहे. कुंभमेळ्यामुळे धार्मिक पर्यटन वाढीस चालना मिळणार असून राज्याची अर्थव्यवस्था बदलण्यास मदत होणार आहे. हे केवळ कुंभपुरते मर्यादित नसून शाश्वत शहर उभारणी आणि राज्याचे जागतिक ब्रॅंडिंग यासाठी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**मराठीलाच प्राधान्य**

हिंदी सक्तीच्या विषयात मागील शासनकाळात डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली १८ तज्ज्ञांची समिती नेमण्यात आली होती. १४ सप्टेंबर २०२१ रोजी सादर झालेल्या १०१ पानी अहवालात इंग्रजी व हिंदी दुसरी भाषा म्हणून पहिलीपासून लागू करण्याची शिफारस होती. ३० जानेवारी २०२२ रोजी मंत्रिमंडळाने त्यास मान्यता दिली होती. मात्र, मराठी हीच राज्यात सक्तीची भाषा राहील, इतर भाषा सक्तीच्या नसतील, असे स्पष्ट करुन बहुभाषिक असणे चुकीचे नसल्याचेही त्यांनी सांगितले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अभियांत्रिकीपासून ते वैद्यकीय शिक्षणापर्यंत सर्व अभ्यासक्रम मातृभाषेतून शिकण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे, असेही त्यांनी सांगितले.

उच्च शिक्षणातील शिष्यवृत्तीसाठी अर्ज केलेल्या ९५.५८ टक्के विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम वितरित करण्यात आली आहे. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना व राजर्षी शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेत २०२३-२४ मध्ये ९८ टक्के विद्यार्थ्यांना तर सन २०२४-२५ मध्ये ९६ टक्के विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला असल्याचे सांगितले.

**युवा प्रशिक्षण योजना ही केवळ तरुणांना अनुभव मिळण्यासाठी**

युवा प्रशिक्षण धोरण जाहीर करतानाच ११ महिन्यांचा कालावधी निश्चित केला होता. नोकरीसाठी जाताना 'अनुभव काय?' असा प्रश्न विचारला जातो. (पान २ वर...)

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### स्वागतार्ह निर्णय

राज्यातील महापालिका आणि नगरपालिका निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर तेथे स्वीकृत नगरसेवकांची निवड करण्यात आली आहे. संख्याबळाच्या आधारावर पक्षांना हे स्वीकृत नगरसेवकपद मिळाले आहेत. त्यातच, नुकतेच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकाही पार पडल्या असून आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्येही स्वीकृत सदस्य असणार आहेत. राज्य मंत्रिमंडळात या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याची सूत्रांची माहिती आहे. जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे २० टक्के सदस्य निवडता येणार असल्याची माहिती आहे. राज्य मंत्रिमंडळ बैठकीत झालेल्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेत सदस्य संख्येच्या १० टक्के तर पंचायत समितीत सदस्य संख्येमागे २० टक्के सदस्य निवडता येणार असल्याची माहिती आहे. किमान ५ सदस्य निवडणे बंधनकारक असणार आहे. यासंदर्भात लवकरच विधिमंडळात कायदा पारीत केला जाणार असल्याची माहिती आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्वीकृत सदस्यसंदर्भात मुख्यमंत्र्यांकडे मागणी केली होती. ग्रामीण राजकारणाच्या दृष्टीने सरकारचा हा महत्त्वाचा निर्णय आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांतर्गत जिल्हा परिषदेत ५ आणि पंचायत समितीमध्ये २ सदस्यांची स्वीकृत सदस्य म्हणून नेमणूक करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करण्यात यावी, अशी मागणी यापूर्वीच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. मुख्यमंत्र्यांनी या विषयावर सकारात्मक प्रतिसाद देत ग्रामविकास विभागाला कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार, आता राज्य मंत्रिमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती आहे. ग्रामीण भागात समाजाभिमुख कार्य करणाऱ्या, परंतु निवडणूक लढविण्याची क्षमता नसलेल्या पात्र कार्यकर्त्यांना विकास प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी उपलब्ध होईल,

# ‘माझा मराठाचि बोलु कौतुकें’

**मराठी भाषा गौरव दिन विशेष लेख**




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिन महाराष्ट्रात ‘मराठी भाषा गौरव दिन’ म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ स्मरणाचा नसून आत्मपरीक्षणाचा आणि आत्मगौरवाचा आहे. माझा मराठाचि बोलु कौतुकें या संतवचनाच्या प्रेरणेने मराठी भाषेच्या ऐतिहासिक परंपरेचा, साहित्यिक वैभवाचा आणि अभिजात स्वरूपाचा सुसंगत आढावा मराठी भाषा गौरव दिनाच्या पार्श्वभूमीवर!!

मराठी भाषेची मुळे प्राचीन महाराष्ट्री प्राकृतमध्ये आढळतात. सातवाहन कालखंडात प्रतिष्ठान नगरी म्हणजेच आजचे पैठण हे राजकीय व सांस्कृतिक केंद्र होते. त्या काळात महाराष्ट्री प्राकृत ही लोकव्यवहार, प्रशासन आणि साहित्यनिर्मितीची प्रभावी भाषा होती. सातवाहन राजा हाल यांनी संकलित केलेली गाथा सप्तशती ही काव्यरचना या भाषिक परंपरेचा भक्कम पुरावा मानली जाते. सुमारे २७८ कवींच्या आर्या या ग्रंथात समाविष्ट असून, इ.स.पूर्व दुसरे शतक ते इ.स. दुसरे शतक या कालखंडातील सामाजिक, सांस्कृतिक आणि भावविश्वाचे प्रतिबिंब त्यातून दिसते. प्रेम, निसर्ग, ग्रामजीवन आणि स्त्री-पुरुष संबंधांचे सूक्ष्म दर्शन घडवणारी ही रचना मराठीच्या भावविश्वाची आद्य पायाभरणी ठरते.

महाराष्ट्री प्राकृत ते अपभ्रंश आणि पुढे प्राचीन मराठी असा भाषिक विकासक्रम दिसतो. शिलालेख, ताम्रपट आणि दानपत्रांतून मराठीच्या आरंभीच्या स्वरूपाचे पुरावे मिळतात. यादवकालीन प्रशासनात मराठीचा वापर वाढला. याच काळात मराठीला लोकभाषेचे बळ लाभले आणि ती ज्ञानप्रसाराचे प्रभावी माध्यम बनली.

संतपरंपरेत संत ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेला तात्त्विक अधिष्ठान दिले. ‘भावार्थदीपिका’ अर्थात ज्ञानेश्वरी आणि ‘अमृतानुभव’ या ग्रंथांमधून त्यांनी संस्कृतातील तत्त्वज्ञान लोकभाषेत आणले. माझा मराठाचि बोलु कौतुकें, परि अमृतातेहि पैजा जिंके या त्यांच्या वचनातून मराठीच्या अभिव्यक्तीशक्तीवरील अढळ विश्वास प्रकट होतो. त्यानंतर संत नामदेव महाराज, संत एकनाथ महाराज, संत तुकाराम महाराज यांच्यासह वारकरी संप्रदायातील सर्व संत परंपरेमुळे अभंग-ओव्यांतून मराठीची अध्यात्मिक व सामाजिक परंपरा अधिक व्यापक झाली. भक्ती चळवळीने मराठीला लोकमान्यता, लोकसंवाद आणि लोकशक्तीचे माध्यम बनवले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यात मराठी ही केवळ लोकभाषा न ठेवता ती राज्यकारभाराची भाषा बनवली. त्यातूनच राजव्यवहार कोष, पत्रव्यवहार, आज्ञापत्रे यांमधून मराठीची प्रशासकीय ताकद अधोरेखित झाली. स्वराज्य स्थापनेच्या प्रक्रियेत मराठीने स्वाभिमानाचे रूप धारण केले. पुढे पेशवेकाळात आणि नंतरच्या काळात शिक्षणव्यवस्थेत मराठीला नवीन आव्हाने आणि संधी लाभल्या. मुद्रणयंत्राच्या आगमनाने वृत्तपत्रे, ग्रंथप्रकाशन आणि आधुनिक साहित्यप्रकार विकसित झाले.

आधुनिक काळात कादंबरी, नाटक, कविता, ललितलेखन, समीक्षा, पत्रकारिता या सर्व क्षेत्रांत मराठीने स्वतंत्र ओळख निर्माण केली.

वि. वा. शिरवाडकर यांनी परभाषेच्या कचेरीत आपली भाषा साहेबासारखी वागवा, पण आपल्या घरात ती आईसारखी जपली पाहिजे, असे सांगत भाषिक स्वाभिमानाची जाणीव करून दिली. साने गुरुजी यांनी मातृभाषेबद्दल कृतज्ञता व्यक्त करत तिचे ऋण मान्य करण्याचा संदेश दिला. या विचारांतून मराठी ही केवळ व्यवहाराची नव्हे तर संस्कारांची भाषा आहे, हे स्पष्ट होते.

केंद्र सरकार कडून मराठी भाषेला प्रदान करण्यात आलेला ‘अभिजात भाषा’ दर्जा हा तिच्या प्राचीन परंपरेचा आणि समृद्ध साहित्यसंपदेचा अधिकृत सन्मान आहे. दोन हजार वर्षांहून अधिक प्राचीन परंपरा, स्वतंत्र साहित्यनिर्मिती, शास्त्रीय ग्रंथसंपदा आणि सततचा भाषिक विकास या सर्व निकषांवर मराठी समर्थपणे उभी आहे. या मान्यतेमुळे संशोधन, शोधनिबंध, विद्यापीठीय अभ्यासक्रम आणि प्राचीन हस्तलिखितांचे जतन यांना नवे बळ मिळणार आहे.

आजच्या डिजिटल युगात मराठीसमोर नवी आव्हाने उभी आहेत. तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, संगणकीय भाषा प्रक्रिया, ई-ग्रंथालये, सामाजिक माध्यमे या सर्व क्षेत्रांत मराठीची उपस्थिती वाढवणे गरजेचे आहे. प्रशासन, विज्ञान-तंत्रज्ञान, उद्योगव्यवहार आणि उच्च शिक्षण यांमध्ये मराठीचा सशक्त वापर होणे ही काळाची गरज आहे, त्या दृष्टीने शासनही प्रयत्नशील आहे. तरुण पिढीत वाचनसंस्कृती, लेखनसंवेदना आणि भाषिक अभिमान रुजवणे ही आपली सर्वांची सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.

मराठी भाषा गौरव दिन हा केवळ औपचारिक उत्सव नसून सांस्कृतिक स्व-ओळखीचा उत्सव आहे. मराठी ही महाराष्ट्राच्या अस्मितेचा आधारस्तंभ आहे; तिच्या शब्दांत इतिहासाचा ठसा, संतवाययाची करुणा, स्वराज्याचा स्वाभिमान आणि आधुनिकतेची झेप सामावलेली आहे.

माझा मराठाचि बोलु कौतुकें ही भावना केवळ उच्चारात न राहता कृतीत उतरावी, मराठीचा वापर वाढावा, तिचे संशोधन-संवर्धन व्हावे आणि ती जागतिक पातळीवर अभिमानाने उभी राहावीहीच मराठी भाषा गौरव दिनानिमित्त अपेक्षा व्यक्त करू या.!!

**– युवराज पाटील**
**जिल्हा माहिती अधिकारी, पुणे**

## पुढील काही वर्षात महाराष्ट्र जगातील १३ वी अर्थव्यवस्था होईल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

(पान १ वरून..) त्यामुळे या योजनेतून सुमारे एक लाख युवकांना विविध विभागांत ११ महिने कामाची संधी देऊन प्रमाणपत्र दिले. त्यामुळे त्यांच्याकडे राज्य प्रशासनात काम केल्याचा अधिकृत अनुभव आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. या योजनेतून कोणालाही कायमस्वरूपी नोकरी देण्याची ‘बॅकडोअर एन्ट्री’ शक्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

रोजगार निर्मितीबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २०२४-२५ मध्ये ७६७ दीनदयाल रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले. या मेळाव्यांत ७,२७३ उद्योजक सहभागी झाले. एकूण १,२७,३५७ उमेदवारांनी सहभाग घेतला असून त्यापैकी ३८,५१२ जणांची निवड झाली. २०२५-२६ मध्ये आतापर्यंत ३७२ रोजगार मेळावे घेण्यात आले. त्यात २०,०६९ उद्योजक सहभागी झाले; १,२९,६५७ उमेदवारांपैकी २४,१०१ जणांची नोकरीसाठी निवड करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी टास्क फोर्स

विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याबाबत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्यावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ‘महाराष्ट्र विद्यार्थी संरक्षण आणि मानसिक कल्याण धोरण २०२५’ संदर्भात शासनाने अहवाल तयार केला आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विशेष ‘टास्क फोर्स’ स्थापन करण्यात आली असून प्रत्येक विद्यापीठाने कोणती पावले उचलली याचा आढावा टास्क फोर्स घेत आहे.

सीमावादावर शासनाची भूमिका एकसंध

सीमावादाबाबत राज्याची भूमिका एकसंध असून समितीने सुचवलेल्या सर्व बाबी शासनाने केल्या आहेत. योग्य वकील नियुक्त केले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच उच्च न्यायालयात लवकर सुनावणी घेण्यासाठी पाठपुरावा करण्याच्या सूचना राज्याच्या महाधिवक्त्यांना दिल्या आहेत.

शेतकऱ्यांना १५,४७२ कोटींची थेट मदत

पूर्वीची पीक विमा योजना ही शेतकऱ्यांच्या हिताची नव्हती. तसेच पिकविमा पद्धतीतील गैरप्रकार टाळण्यासाठी सुधारणा करण्यात आली. मागील वर्षी शेतकऱ्यांवर आलेल्या संकटकाळात राज्य शासनाने १५,४७२ कोटी रुपये डीबीटीद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केले आहेत. कर्जमाफीचे आश्वासन उचित वेळी पूर्ण केले जाईल. ‘ग्रीस्टॅक’द्वारे डिजिटल जमीन नोंदणी आणि आधार संलग्न करून मदत देण्यात येईल. या माध्यमातून शेतीचा डिजिटल रेकॉर्ड तयार केला जात आहे. या रेकॉर्डमध्ये शेतकऱ्यांची नोंदणी, त्यांच्या जमिनीची नोंदणी, सातबाराचा अहवाल याची यात नोंद असेल.

हा डिजिटल रेकॉर्ड, आधार क्रमांक या सर्व गोष्टी एकत्रित ठेवून कर्जमाफीबाबत विचार केला जात आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले. मका खरेदीचे लक्ष्य वाढवले असून धानासाठीही लक्ष्य वाढवले जाणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

कृषी पंप, वीज सवलत आणि विक्रम

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मागेल त्याला कृषी पंप योजनेत मागणी केलेल्या ८५ टक्के शेतकऱ्यांना कृषी पंप देण्यात आले. २०२२ ते २०२५ दरम्यान १०.६३ लाख पंप बसवले. एका महिन्यात ५० हजार पंप बसवण्याची गिनीज बुकमध्ये नोंद झाली. वीजबिल सवलतीपोटी २३ हजार कोटी खर्च करण्यात आले आहेत. सिंचन व पाणी वापरामध्ये महाराष्ट्राला सर्वोत्तम राज्याचा पुरस्कार मिळाल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

कर्करोग उपचारासाठी त्रिस्तरीय प्रणाली

राज्यात त्रिस्तरीय कर्करोग उपचार व्यवस्था सुरू करण्यात आली आहे. महाकेअर फाऊंडेशनच्या माध्यमातून कॅन्सरवरील उपचाराची व्यवस्था उभारण्यात येणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासाठी ४०० कोटी

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इंदू मिल येथील स्मारकासाठी यावर्षी ४०० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. स्ट्रक्चरलचे काम शंभर टक्के पूर्ण झाले असून प्रवेशद्वार इमारतीचे काम ९६ टक्के झाले आहे. स्मारकाचे काम लवकर पूर्ण केले जाईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

शिवस्मारकाबाबत उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयातील सुनावण्यांचा आढावा घेत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने प्रकरण पुन्हा उच्च न्यायालयाकडे पाठवले आहे. सुनावणी पूर्ण होईपर्यंत ‘स्टेटस को’ ठेवण्याचे निर्देश आहेत. राज्य शासन सातत्याने पाठपुरावा करत आहे.

प्रशासनिक सुधारणा आणि डिजिटायझेशनवर भर

राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवा व प्रशिक्षण विषयक धोरण तयार करण्यात आले आहे. अनेक विभागांचे सेवाप्रवेश नियम कालबाह्य झाले होते, ते बदलण्यात आले आहेत. राज्यात ई एचआरएमएस प्रणाली सुरू करण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तिका, विभागीय चौकशी आदी सर्व गोष्टी आता ऑनलाईन करण्यात येत आहेत. १५० दिवसांच्या कार्यक्रमांतर्गत अनेक विभागांनी उल्लेखनीय कामगिरी केली. १९६० पासून एकाच विषयावर काढलेल्या शासन निर्णयांचे एकत्रिकरण सुरू आहे. सेवापुस्तिकांचे डिजिटायझेशन आणि प्रशासन सुलभ करण्याचे काम सुरू आहे.

भाषणाच्या शेवटी मुख्यमंत्र्यांनी खुदसे जितने की जिद है मेरी, मुझे खुदको ही हराना है

मै भीड नहीं हू दुनिया की, मेरे अंदर भी जमाना है या कवितेच्या ओळी उद्धृत करून सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याचे काम शासन करेल, असा निर्धार व्यक्त केला.

## समाजसेवक सचिन गंभीरे यांच्या वाढदिवसानिमित्त गायरान वस्ती शाळेमध्ये विद्यार्थ्यांना वही, पेन व खाऊचे वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ईटकुर प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : ईटकुर येथील आयुष्यमान भारत योजना तालुका संयोजक, विविध कार्यकारी सोसायटीचे संचालक आणि सेवाभावी संस्थेचे दीपस्तंभ सचिव म्हणून काम करत करत खऱ्या समाजसेवेची आवड असणारे, ईटकुर चे पुत्र समाजसेवक सचिन आप्पा गंभीरे यांनी आपला वाढदिवस अवाढव्य खर्च न करता जिल्हा परिषद प्राथमिक गायरान वस्ती ईटकुर या शाळेमध्ये १ ली ते चौथीच्या मुलांना वही, पेन व खाऊचे वाटप करून आपला वाढदिवस एका चांगल्या विचाराने प्रेरित केला.

ही शाळा गावच्या बाहेर गायरान वस्ती या ठिकाणी असल्यामुळे या ठिकाणी कुठलेही बाहेरचे सामाजिक कार्यक्रम होत नाहीत,असं विद्यार्थी व शिक्षकांच्या बोलण्यातून आढळून आले, अशा वाढदिवसाच्या निमित्ताने त्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर प्रफुल्लित वातावरण निर्माण झालं होतं.या वाढदिवसानिमित्त शशिकांत आडसूळ सर यांनी विद्यार्थ्यांच्या अभ्यासाची चाचपणी करून त्यांना मार्गदर्शन केले, आडसुळ सरानी विद्यार्थ्यांना बक्षीस सुद्धा दिले.वल्लभ पोते आणि सचिन गंभीरे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी या कार्यक्रमाला शशिकांत अडसूळ सर, वल्लभ पोते, पत्रकार सुधाकर रणदिवे, स्वप्निल अडसूळ, शाळेच्या मुख्याध्यापिका गायकवाड मॅडम, जगदाळे सर, मंगलताई लगाडे, अंकितताई लगाडे, व विद्यार्थी / विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**लागवडीपासून हार्वेस्टिंग पर्यंत आधुनिक तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन: शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

# डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर येथील शेतकऱ्यांचा सविस्तर अभ्यास दौरा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आटपाडी तालुक्यातील डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांसाठी डाळिंब पिकाची आधुनिक तंत्रज्ञान समजावे या उद्देशाने डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर आणि रेनीती ॲग्रो, सोलापूर येथे डाळिंब अभ्यास दौऱ्याची आयोजन.



महाराष्ट्र कृषी उद्योग, आटपाडी कडून करण्यात आले. या अभ्यास दौऱ्यात आटपाडी परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी डाळिंब तज्ञ डॉक्टर श्री सोमनाथ पोखरे यांनी शेतकऱ्यांना डाळिंब पिकाविषयी लागवडीपासून ते काढणीपर्यंत संपूर्ण तंत्रज्ञान स्लाईड सादरीकरणाद्वारे सविस्तर समजावून सांगितले डाळिंब लागवडीसाठी योग्य जमीन निवड, माती परीक्षणाचे महत्व, खड्डे भरण्याची पद्धत, योग्य मानाची निवड, रोपांची लागवड पद्धत तसेच ठिबक सिंचनाद्वारे पाणी व्यवस्थापन कसे करावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच डाळिंब पिकामध्ये योग्य खत व्यवस्थापन, सूक्ष्म अन्नद्रव्याचा वापर, पिकाची योगदान वाढ होण्यासाठी आवश्यक फवारण्या, ड्रेसिंग कसे करावे, झाडांची वाढ नियंत्रित करण्यासाठी योग्य छाटणी तंत्रज्ञान, बहार व्यवस्थापन, फुलधारणा वाढवण्याचे उपाय आणि दर्जेदार उत्पादन मिळवण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत माहिती देण्यात आली. रेनीती अग्रोच्या शास्त्रज्ञाने जीवांवरील सर्व शंकांचे निरसन केले आणि नवीन ग्लुकोनेटेड टेक्नॉलॉजी ची माहिती दिली. या कार्यक्रमाप्रसंगी मॅरेजिंगडायटर उदय पाटील, अंबाना आचलरे, वानखेडे, आणि कंपनी प्रतिनिधी उपस्थित होते डाळिंब पिकांमध्ये येणाऱ्या प्रमुख रोग व किडी बाबतची सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले विशेषता मर रोग, तेल्या रोग, फळकुज, थ्रिप्स मिलीबग, आणि डाग रोग यांची लक्षणे ओळखण्याची पद्धत तसेच त्यावरील नियंत्रण उपाय सांगण्यात आले. झाडांची मर कशी सुरु होते, मुळे कुठे खराब होतात, कळी कशी फुटते आणि झाड निरोगी ठेवण्यासाठी कोणती काळजी घ्यावी याची प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर शेतकऱ्यांना संशोधन केंद्रातील डाळिंब प्रात्यक्षिक प्लॉटची पाहणी करून प्रत्यक्ष झाडावर छाटणी तंत्रज्ञान बहार व्यवस्थापन, फळधारणा वाढवण्याचे उपाय, ड्रेसिंग पद्धती, खत देण्याची योग्य वेळ आणि उत्पादन वाढवण्यासाठी आवश्यक तांत्रिक बाबी दाखवण्यात आल्या. झाडांची योग्य वाढ, फळांची गुणवत्ता आणि बाजारपेठेत चांगला दर मिळवण्यासाठी घ्यावयाच्या उपाययोजनावर विशेष भर देण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांनी डाळिंब पिकातील विविध अडचणी बाबत प्रश्न विचारले असता श्री पोखरे यांनी त्यांचे सविस्तर निरसन करून योग्य मार्गदर्शन केले कार्यक्रमाची प्रास्ताविक अक्षय सागर (महाराष्ट्र कृषी उद्योग आटपाडी) यांनी केले तर कार्यक्रमाच्या शेवटी ग्रीकॉस चे अजय आधाटे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या अभ्यास दौऱ्यामुळे शेतकऱ्यांना डाळिंब पिकाचे आधुनिक आणि शास्त्रीय तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली असून उत्पादन वाढ आणि दर्जेदार फळ निर्मितीसाठी हा अभ्यास दौरा अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याची माहिती शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# २८ फेब्रुवारी रोजी वाशिम येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉक्टर विश्वास आरोटे यांनी दिली माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमानाने शनिवार दि. २८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता वैकंठधाम वासी मातोश्री सौ. स्नेहलता पुनमचंद सोमाणी परिसर वाटाणे लॉन वाशिम येथे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन, पुरस्कार व पदाधिकारी सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉक्टर विश्वास आरोटे यांनी दिली




स्थानिक वाटाणे लॉन येथे आयोजित राज्यस्तरीय पत्रकार संम्मेलनाचे उद्घाटन केंद्रीय आयुष मंत्री ना. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे. सहउद्घाटक म्हणून महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकंत्री ना. दत्तात्रय भरणे राहतील. विशेष आशिर्वाद उपस्थिती म्हणून आयोध्या मंदिर कोषाध्यक्ष गोविंद गिरी महाराज यांचे बंधू भागवताचार्य प.पु. रमाकांत व्यास,पाध्यक्ष राजु भांदुर्गे, महाराष्ट्र संघाचे प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे. राज्य संघटक संजय भोकरे. डिजीटल मिडिया अध्यक्ष सिध्दार्थ भोकरे.प्रसिध्दीप्रमुख नवनाथ जाधव, प्रदेश उपाध्यक्ष महेश पानशे ..किशोर रायसाकडा अशोक देडे. डॉ. अभय कुमार दांडगे. संपर्क प्रमुख वैभव स्वामी . कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष अनिल रहाणे. विदर्भ प्रमुख नयन मोंढे ... पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष राजेंद्र कोरटे.नागपूर विदर्भ प्रमुख अनुपम कुमार भार्गव विशेष अतिथी म्हणून सहकार मंत्री ना. आकाश फुंडकर, कॅबीनेट मंत्री ना. संजय राठोड, , विभागीय अध्यक्ष सुनिल फुलारी, चर्मकार समाज जिल्हाध्यक्ष दिपक ढोके उपस्थित राहणार आहेत.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने यंदाचा उत्कृष्ट संघटक युवा चेतना पुरस्कार २०२५ /२६ .....श्री किशोर रायसाकडा प्रदेश उपाध्यक्ष.... पाचोरा जळगाव..... उत्तर महाराष्ट्र उत्कृष्ट संघटक

श्री नयन मोंढे... उत्कृष्ट संघटक अमरावती ......विदर्भ अध्यक्ष

श्री राकेश खराडे.रायगड जिल्हा अध्यक्ष.... उत्कृष्ट संघटक कोकण विभाग

श्री. शंकर बोरघरे ...... उत्कृष्ट संघटक....चंद्रपूर गडचिरोली जिल्हाध्यक्ष

श्री अनुपम कुमार भार्गव... वर्धा.. उत्कृष्ट संघटक.. नागपूर विदर्भ

श्री वैभवजी स्वामी.. प्रदेश संपर्कप्रमुख...बिड.. मराठवाडा उत्कृष्ट संघटक...

गणेश देवगावकर जिल्हाध्यक्ष सोशल मीडिया वाशिम... उत्कृष्ट संघटक.... नागेश आदापुरे ... पंढरपूर...पश्चिम महाराष्ट्र उत्कृष्ट संघटक

........... मा... दशरथ चव्हाण . जिल्हा अध्यक्ष...नवी मुंबई .... उत्कृष्ट संघटक... ..

मा पोपटराव गवांदे मु पो इगतपुरी नाशिक जिल्हा.. उत्कृष्ट संघटक... यांना सन्मानीत करण्यात येणार आहे.

दुपारी २ ते ३ वाजेपर्यंत पत्रकारांचा डिएनए काय व अजितदादा पवार यांच्या मृत्यूचे राजकारण तर होत नाही ना? या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले असून, यामध्ये राज्यसंघटक सिध्दार्थ भोकरे, जेष्ठ संपादक डॉ. राजेश राजोरे, प्रदेश अध्यक्ष गोविंद वाकोडे, प्रदेश सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे सहभागी होतील. चर्चासत्राचे संचालन प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमाणी करतील. दुपारी ३ ते ४ च्या दरम्यान पदाधिकारी सन्मान सोहळा व ४ ते ५ वाजेपर्यंत द्वितीय प्रबोधन सत्र पार पडतील यामध्ये जेष्ठ संपादक डॉ. राजेश राजोरे हे सायबर युगातील माध्यमे आणि मुल्यनिष्ठ पत्रकारीता या विषयावर मार्गदर्शन करतील. प्रबोधन सत्राचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ संघटक संजय भोकरे, अध्यक्षस्थानी ॲड. सौ. भारती सोमाणी, प्रमुख अतिथी सौ. वृषाली टेकाळे हे राहतील. यावेळी.... संत विचारातून अभिव्यक्ती स्वातंत्र्य या विषयावर प्रचार प्रमुख गोपाल कडू मार्गदर्शन करतील, सभाध्यक्ष सर ह.भ.प. प्रकाश महाराज वाघ, उद्घाटक दामोदर पाटील गुरजी, विशेष अतिथी बाबाराव पाटील राहतील. सदर कार्यक्रमामध्ये सहकार्य करणार्या मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पत्रकार बांधव यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन निमंत्रक आ. शाम खोडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉक्टर विश्वासराव आरोटे.निलेश सोमाणी, स्वागताध्यक्ष गिरधारीलाल सारडा, मुख्य समन्वयक डॉ. हरिष बाहेती, सहस्वागतध्यक्ष देवेंद्र खडसे पाटील, कार्याध्यक्ष शिवाजीराव वाटाणे, पत्रकार ॲड. भारती सोमाणी, विदर्भ अध्यक्ष नयन मुंढे, विदर्भ कार्याध्यक्ष अभय खेडकर, विभाग अध्यक्ष सुनिल फुलारी, जिल्हाध्यक्ष किरण क्षार, शहर जिल्हाध्यक्ष पप्पु घुगे, इलेक्ट्रॉनिक मिडीया जिल्हाध्यक्ष राम धनगर, सोशल मिडीया जिल्हाध्यक्ष गणेश देगांवकर, डिजीटील मिडीया जिल्हाध्यक्ष कैलास महाजन, सहजिल्हाध्यक्ष संजय खडसे, विदर्भ समन्वयक मोहीत कर्नावट विदर्भ उपाध्यक्ष संजय कडोळे, प्रदेश सदस्य पंकज सोनोने, रवि अंभोरे, नारायण आरु, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती जिल्हाध्यख प्रफुल बानगावकर, जिल्हा उपाध्यक्ष समिर देशपांडे, अमोल अघम, संतोष गुल्हाणे, राजकुमार ठाकूर, संजय राठी, शाम अपूर्वा, बंडू राठोड, शिवाजी खडसे, ॲड. सुरेश टेकाळे, सौ. वृषाली टेकाळे, गोरखनाथ भागवत, विजय घोंगडे, यांनी केले आहे. सदर कार्यक्रमस्थळी प्रवेशद्वाराला विदर्भ केसरी स्व. ब्रजलाल बियाणी तर परिसराला वैकुंठधामवासी सौ. स्नेहलता पुनमचंद सोमाणी परिसर नाव देण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाला सर्व पदाधिकारी पत्रकार बांधव यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ वतीने करण्यात आले आहे.

**महाराष्ट्र राज्य पत्रकार.संघटनात्मक युवा चेतना पुरस्कार २०२५ २६ जाहीर..श्री किशोर रायसाकडा प्रदेश उपाध्यक्ष.... पाचोरा जळगाव..... उत्तर महाराष्ट्र उत्कृष्ट संघटक**

**श्री नयन मोंढे... उत्कृष्ट संघटक अमरावती ......विदर्भ अध्यक्ष**

**श्री राकेश खराडे.रायगड जिल्हा अध्यक्ष.... उत्कृष्ट संघटक कोकण विभाग**

**श्री. शंकर बोरचाटे ...... उत्कृष्ट संघटक....चंद्रपूर गडचिरोली जिल्हाध्यक्ष**

**श्री अनुपम कुमार भार्गव... वर्धा.. उत्कृष्ट संघटक.. नागपूर विदर्भ**

**श्री वैभवजी स्वामी.. प्रदेश संपर्कप्रमुख...बिड.. मराठवाडा उत्कृष्ट संघटक...**

**गणेश देवगावकर जिल्हाध्यक्ष सोशल मीडिया वाशिम... उत्कृष्ट संघटक.... नागेश आदापुरे ... पंढरपूर...पश्चिम महाराष्ट्र उत्कृष्ट संघटक**

**........... मा... दशरथ चव्हाण . जिल्हा अध्यक्ष...नवी मुंबई .... उत्कृष्ट संघटक... मा पोपटराव गवांदे मु पो इगतपुरी नाशिक जिल्हा.. उत्कृष्ट संघटक...यांना जाहीर करण्यात आला.**

---

# माजी विद्यार्थ्याने जपला कर्तुत्व व दातृत्वाचा संगम आईच्या स्मृतीप्रित्यर्थ शाळेस एल.ई.डी.स्क्रीन टीव्ही भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




निफाड/प्रतिनिधी : महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित पालखेड येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा आंतरराष्ट्रीय कंपनीत अभियंता असलेले संतोष काळे यांनी आई- सुमनबाई नामदेवराव काळे यांच्या स्मृतीपित्यर्थ एल.ई.डी.स्क्रीन टीव्ही विद्यार्थ्यांसाठी विद्यालयास भेट दिला. यावेळी त्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या शिक्षणाच्या विविध संधी, विचारांची उंच पातळी, संस्कार यावर विद्यार्थ्यांना प्रेरणादायी व्याख्यान देऊन विविध अनुभव सांगितले. यावेळी विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक अशोक शेळके यांनी शाल, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला.

याप्रसंगी मुख्याध्यापक अशोक शेळके, ज्येष्ठ शिक्षक निलेश गवांदे यांसह दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे, संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे, राहुल दवते, वैशाली मोते, सागर जाधव, राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव, संजय कोकतरे, कविता ढोमसे, सारिका पवळे, सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी आदींसह विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सावन जाधव यांनी तर आभार संजय लव्हांगडे यांनी मानले.

---

# हौसिंग सोसायट्यावरील प्रशासक हटले, समितीच्या निवडणूकांची प्रक्रिया सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी मुंबई/केतन भोज : नवी मुंबईतील २०० सहकारी गृहनिर्माण संस्थेवरील प्रशासकराज संपवा यासाठी सहकार संवर्धन समिती व माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ यांनी नवी मुंबईत सीबीडी बेलापूर येथे २३ फेब्रुवारी पासून साखळी उपोषण सुरू केलेले होते. या आंदोलनाची दखल घेत बहुतेक मागण्या मान्य झाल्या आहेत. तसे लेखी पत्र सहकार सहनिबंधक सिडको श्री.राजेंद्र वीर यांनी आंदोलनकर्ते सुभाष बसवेकर यांना दिले आहे. नवी मुंबई सिडको कार्यक्षेत्रातील सुमारे २०३ सहकारी गृहनिर्माण संस्थावर गेल्या तीन वर्षा पासून प्रशासक बसविले गेले होते.त्यातील बहुतेक प्रशासकांची कायदेशीर मुदत संपूनही ते त्या ठिकाणी बेकायदा कार्यरत होते. एकूण २०३ सहकारी सोसायट्यापैकी ७६ संस्थाच्या निवडणूका पार पडलेल्या असून उवरीत पैकी ७२ संस्थावर निवडणूक अधिकारी नियुक्त करून निवडणूकीची प्रक्रिया सुरू झालेली आहे. उर्वरीत दप्तर ताबा अप्राप्त असणाऱ्या ३१ संस्थाच्या दप्तरांचा ताबा घेऊन तेथील कामकाज सुरळीत करण्यात येईल. बाकी राहिलेल्या २४ संस्थापैकी १९ संस्थावर निवडणूक अधिकारी नियुक्तीची प्रक्रिया सुरू आहे. आता उरलेल्या केवळ पाच सहकारी गृहनिर्माण संस्थावर प्रशासक असून त्यांनाही लवकरच बाजूला करून तेथे ही शीघ्र तितक्या लवकर लोकशाही



पद्धतीने निवडणूका घेतल्या जाणार आहेत. अशी लेखी माहिती सह निबंधक सहकारी संस्था सिडको या कार्यालयाच्या वतीने देण्यात आंदोलकांना देण्यात आली आहे.

### आर्थिक व्यवहारांची चौकशी होणार

तसेच गेल्या तीन वर्षात नियुक्त केलेल्या या प्रशासकांनी मानमानी मानधन उचलले असून कायद्याची मर्यादा ओलांडून आर्थिक व्यवहार केलेले आहे.त्या सर्व प्रशासकांच्या आर्थिक व्यवहाराची व मानधनांची चौकशी करण्यासाठी श्री.अविनाश भागवत, उपनिबंधक ठाणे शहर यांची नियुक्ती केली असून दोन महिन्याच्या आत चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले गेले आहेत. विशेष म्हणजे, एका प्रशासकांस २०,१५, १० अशा संख्येने सोसायट्या बहाल केल्या होत्या. हा प्रकार आता बंद होणार असून या पुढे एका प्रशासकाची तीन पेक्षा जास्त संस्थावर नियुक्त होणार नाही याची दक्षता घेतली जाणार आहे.असे ही निबंधकांच्या वतीने आंदोलकांना लेखी कळविले आहे. हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी मानवी हक्क कार्यकर्ते प्रशांत बोरकर मुंबई यांनी पुढाकार घेतला. तसेच नवी मुंबईतील सहकार संवर्धन समिती आणि माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे कार्यकर्ते व नवी मुंबई नागरिक मंच च्या कार्यकर्त्यांनी विशेष योगदान दिले.

### सततच्या पाठपुराव्याला यश

सदर आंदोलनाचा हेतू सफल झाला असून हे आंदोलन तूर्त थांबविले जात आहे. या पुढे निबंधकांच्या लेखी अश्वासनावर आम्ही नजर ठेवून ती पूर्ण करून घेऊ असे आंदोलक सुभाष बसवेकर यांनी म्हटले आहे.

---

### हजारो नागरिकांना दिलासा

# प्रभाग २२ साठी आरोग्याचा नवा श्वास! सोनी नगर येथे नूतन ‘आरोग्यवर्धिनी केंद्र’ सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर : सोलापूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक २२ मधील नागरिकांसाठी आरोग्याच्या दृष्टीने मोठी आणि दिलासादायक ठरला आहे. सोनी नगर येथे नूतन ‘आरोग्यवर्धिनी केंद्र’ उभारण्यात आले असून परिसरातील हजारो नागरिकांना याचा थेट लाभ होणार आहे. या केंद्रासाठी प्रभागातील भाजपा नगरसेवक किसन जाधव, दत्तात्रय नडगिरी, सौ. अंबिका नागेश अण्णा गायकवाड व सौ. चैत्रालीताई शिवराज गायकवाड यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे आणि सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र कोठे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे आणि प्रशासनाच्या सहकार्याने हे केंद्र साकार झाले. सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, उपायुक्त लोकरे साहेब व आरोग्य अधिकारी राखी माने यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्राची उभारणी पूर्ण झाली. या केंद्रामुळे सोनी नगर हडको, लहान इरण्णा वस्ती, मोठी इरण्णा वस्ती, रेवणसिद्धेश्वर नगर झोपडपट्टी, आम्रपाली चौक परिसरातील नागरिकांना आर्थिक आणि आरोग्यदृष्ट्या मोठा फायदा होणार आहे. उद्घाटनानिमित्त आयोजित आरोग्य शिबिरात तज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांची तपासणी करून मोफत औषधोपचार देण्यात आले. अत्याधुनिक सोयी-सुविधांनी सुसज्ज असलेले हे केंद्र कष्टकरी कामगारांसाठी वरदान ठरणार असल्याचे नगरसेवक किसन जाधव यांनी सांगितले.

तसेच या उपक्रमासाठी पालकमंत्री गोरे आणि आमदार कोठे यांचे त्यांनी विशेष आभार मानले. प्रभाग २२ मध्ये आरोग्यसेवेचा हा नवा अध्याय ठरून नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या आरोग्य शिबिराप्रसंगी डॉ. म्हेत्रे, प्राजक्ता काकडे, रुपेश गायकवाड, संतोष माने, इस्माईल मनुरे, मल्लिकार्जुन बेनावत, अविनाश गवळी, उमेश चलवादी,प्रीती गायकवाड आदी आरोग्य केंद्रातील कर्मचारी यांच्यासह नागेश ढेंगळे, संतोष गायकवाड, हरीश तेलगू, विकी सगटे, सिद्राम माडेकर, येलगुंडे मावशी, वसंत पवार आदींची उपस्थिती होती. या आरोग्य शिबिरास परिसरातील नागरिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

---

# बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत पक्षाच्या वतीने सतीश सावंत यांची पश्चिम महाराष्ट्र सह संपर्कप्रमुखपदी नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पूर्ण सेवाच हीच ईश्वर सेवा या ब्रीद वाक्याने कार्यरत असलेल्या डॉक्टर श्रीकांत शिंदे फाउंडेशन तसेच वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वंदनीय मदत कक्षाच्या वतीने सतीश रावसाहेब सावंत यांची पश्चिम महाराष्ट्र सह संपर्कप्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ही नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. दिनांक २४ फेब्रुवारी २०२६ रोजी नियुक्तीपत्र देण्यात आले.



युक्ती नंतर सतीश भाऊ सावंत यांनी वैद्यकीय मदत कक्षेच्या माध्यमातून गोरगरीब, गरजू व या दुर्बल रुग्णांना धर्मादाय रुग्णालय व खटाव उपलब्ध करून देणे, पात्र रुग्णावर मोफत सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया करून सहकार्य करणे, तसेच अपेक्षित आहे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत नोंदणीकृत रुग्णांना मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे गंभीर व मागण्या शस्त्रक्रियेसाठी गरजू रुग्णांना देण्यासाठी पंतप्रधान वैद्यकीय सहायता निधी वैद्यकीय मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी तसेच विविध धर्मादाय ट्रस्ट माध्यमातून सहकार्य मिळवून देण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे यासाठी ठाणे येथील बाळासाहेब भवन मुख्य कार्यालय येथे समन्वय साधण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत संस्थापक अध्यक्ष मंगेश नरसिंह चुटे कार्याध्यक्ष रामहरी भीमराव राऊत यांच्या स्वाक्ष हे नियुक्तीपत्र देण्यात आले आहे.

# 'महावितरण'ने उत्पन्न वाढीसाठी 'आयपीओ' आणून 'कॉर्पोरेट गव्हर्नन्स' चा अंमल करावा : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## एमएसईबी सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड कंपनीचे कार्यान्वयन सुरु करावे; महावितरणच्या पुनर्रचित आराखड्याचे सादरीकरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ऊर्जा क्षेत्रात कार्यरत असलेल्या बाजारपेठेचा लाभ उठवित महावितरणने आयपीओ (इनिशियल पब्लिक ऑफरिंग) आणत उत्पन्नाचा कायमस्वरूपी स्रोत निर्माण करून तोट्याकडून नफ्याकडे वळावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देत कंपनीने आपल्या कारभारात ' कॉर्पोरेट गव्हर्नन्स' चा अंमल करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ऊर्जा विभागाने एमएसईबी सोलर ॲग्रो पॉवर लिमिटेड कंपनी निर्माण केली आहे. नवीन कंपनीमुळे कृषी क्षेत्राच्या दायित्वापोटी सध्या तोट्यात असलेल्या महावितरण कंपनीचे विभाजन झाल्यामुळे कंपनी नफ्यात आलेली दिसेल. या कंपनीचे कार्यान्वयन सुरू करण्याची सूचनाही त्यांनी दिली.

कृषी क्षेत्राच्या राज्य शासनाच्या हमीची रक्कम कंपनीला येणाऱ्या वित्त आयोगाच्या निधीतून देण्यात यावी. नवीन सोलर ग्रो पावर लिमिटेड कंपनीला ठराविक मर्यादेपर्यंत आणि कालावधीसाठी शासनाच्या वतीने अनुदान देण्यात येईल. त्यानंतर कंपनीला स्वतःच्या उत्पन्नाचे स्रोत निर्माण करावे लागतील. जेणेकरून भविष्यात शासनाकडे निधी मागणीची वेळ येणार नाही, असेही फडणवीस यावेळी म्हणाले.



भांडवली बाजारात कंपनीने ' आयपीओ' च्या माध्यमातून प्रवेश केल्यास मोठ्या प्रमाणावर समभाग धारकांकडून गुंतवणूक होऊन कंपनीसाठी निधी उपलब्ध करता येईल. सध्या कंपनीची ७६ हजार १८९ कोटी रुपयांची थकबाकी आहे. यामध्ये ५९ हजार ५२७ कोटी रुपये कृषी क्षेत्राशी सबंधित आहेत. कंपनीला स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी आर्थिक पुनर्रचनेची गरज आहे. शासनाकडून हमी स्वरूपात असलेल्या ३२ हजार ६७९ कोटी देण्याबाबत टप्प्याटप्प्याने कार्यवाही करण्यात यावी, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. भारत सरकारच्या प्रस्तावित योजनेनुसार राज्य शासन जीएसडीपीच्या (सकल राज्य देशांतर्गत उत्पादन) ०.५ टक्के रक्कम महावितरणला मिळण्यासाठी प्रयत्न करावे. प्रस्तावित पुनर्रचना योजनेच्या अंमलबजावणीनंतर निधी मागण्याची आवश्यकता राहणार नसल्याने शासनाची बचत होणार आहे. यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करून कार्यवाही पूर्ण करावी.

बैठकीला मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ . पी गुप्ता, अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा तसेच संचालक उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा यांनी सादरीकरण केले.

---

## श्री रूक्मिणी सभामंडपातील ऐतिहासिक चित्रांबाबत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवतांच्या मंदिरांचा जतन, संवर्धन व जिर्णोद्धाराची कामे शासनाच्या निधीतून पुरातत्व विभागामार्फत माहे डिसेंबर २०२३ पासून हाती घेण्यात आलेली आहेत. मंजूर आराखड्यानुसार कामे टप्प्याटप्प्याने राबविण्यात येत आहेत. पहिल्या टप्प्यात विठ्ठल गाभारा, रूक्मिणी गाभारा, बाजीराव पडसाळी तसेच विठ्ठल सभामंडप येथील जतन व दुरुस्तीची कामे पूर्णत्वास आली आहेत.

सध्या श्री रूक्मिणी सभामंडप तसेच इतर अनुषंगिक भागांमध्ये जतन व संवर्धनाची कामे सुरू आहेत. श्री रूक्मिणी सभामंडपामध्ये श्री रूक्मिणी स्वयंवराची ऐतिहासिक व धार्मिक महत्त्व असलेली चित्रे पूर्वी स्थापित करण्यात आलेली होती. तथापि, सभामंडपातील संरचनात्मक दुरुस्ती व संवर्धनाची कामे सुरू असताना चित्रांचे कोणतेही नुकसान होऊ नये, तसेच त्यांची मूळ अवस्था सुरक्षित राहावी यासाठी संबंधित चित्रे तात्पुरत्या स्वरूपात काळजीपूर्वक काढून सुरक्षित स्थळी संरक्षित करून ठेवण्यात आली आहेत. चित्रांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देऊन, सभामंडपातील कामे पूर्ण झाल्यानंतर सदरची ऐतिहासिक चित्रे मूळ ठिकाणी पूर्ववत पद्धतीने पुन्हा स्थापित करण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

## अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या कळंब तालुकाध्यक्षपदी निखील बिटके यांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील पश्चिम लोहटा येथील निखिल शंकर बिटके यांची अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती कळंब तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांना लातुर येथील संघटनेच्या कार्यालयात संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अनिल दादा देसले व राष्ट्रीय अध्यक्ष स्वातंत्र्य सैनिक प्रदिप बाबा पाटील खंडापूरकर यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. देण्यात आलेल्या नियुक्ती पत्रात असे म्हटले आहे की, निखील शंकर बिटके यांना कळंब तालुकाध्यक्ष या पदावर नियुक्त केले असुन त्यांनी सर्वसामान्यांचे प्रश्न संघटनेच्या माध्यमातून सोडविण्यासाठी सतत प्रयत्नशील राहून कार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. या निवडीवेळी भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती माझी सैनिक धाराशिव जिल्हा विभागाचे जिल्हाध्यक्ष विनोद सावंत हे उपस्थित होते. सदरील निवडी बद्दल निखिल बिटके यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## आम्हाला गर्व हिंदुत्वाचा व्हॉट्सप ग्रुपच्या माध्यमातून हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त सामाजिक उपक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




मुंबई/केतन भोज : आम्हाला गर्व हिंदुत्वाचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या महाराष्ट्रातील शिवसैनिक सदस्य असलेला व्हॉट्सप ग्रुपच्या माध्यमातून सामाजिकसेवा अंतर्गत हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त सामाजिक ३१ वा उपक्रम जिल्हा नाशिक, त्र्यंबकेश्वर येथील आधार तीर्थ या आश्रमात आचार संहिता मुळे २२ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आला. आधार तीर्थ या आश्रमातील मागणीनुसार अनाथ लहान मुलांना बसण्यासाठी ५ गार्डन बेंच, विविध प्रकारचे कडधान्य, लहान मुलांना खेळण्यासाठी क्रीडांगण साहित्य, भरपूर प्रमाणात शालेय वस्तू, लहान मुलांना कपडे, वेगवेगळ्या प्रकारचे बिस्कीट, फरसाण तसेच गृहउपयोगी वस्तू भरपूर प्रमाणात अनाथ आश्रमास देण्यात आले.

या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातून आलेले ग्रुपचे ५० सदस्य उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून दत्ता नाना गायकवाड (शिवसेना उपनेता नाशिक), सौ.स्वाती पाटील ताई (महिला जिल्हा संघटीका नाशिक), महेश बडवे(उपजिल्हा प्रमुख नाशिक), नितीन जाधव(विभाग प्रमुख नाशिक), गिरीष मुसळे(व्यवस्थापक) तसेच ग्रुपचे संतोष पाटील (संस्थापक, संचालक), महेंद्र गुरव (संचालक), सुरेश वाडकर (अध्यक्ष), लवेश म्हात्रे(सेक्रेटरी), लिलाधर भोईर (प्रवक्ते), सौ. संपदा धोंगडे (प्रवक्ते), संदीप गुरव, भालचंद्र उकिर्डे, वासंती गोताड, प्रवीण कोरपे, सुजाता धारगळकर, सोनिया पाटील,दिलीप गावडे, संतोष झोळ, अनिल कांबळे,विलास चव्हाण, सुनील काप तसेच विविध विभागातून आलेले ग्रुपचे असंख्य सदस्य उपस्थित होते.

## छत्रपती शिक्षण मंडळ, पडघा यांचा शिवशौर्यगाथेत सलग दुसऱ्यांदा प्रथम क्रमांक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा येथील छत्रपती शिक्षण मंडळाच्या कला व वाणिज्य महाविद्यालयाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन पोवाडा गायन स्पर्धेत सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक पटकावत अभिमानास्पद यश संपादन केले आहे. शिवचरित्रावर आधारित - शिवशौर्यगाथा या विषयावर घेण्यात आलेल्या महाअंतिम फेरीत विद्यार्थ्यांनी आपल्या प्रभावी सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.




मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने जयंतीनिमित्त या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. इतिहासातील शौर्य, पराक्रम आणि स्वराज्य स्थापनेची गाथा पोवाड्याच्या माध्यमातून जिवंत करत पडघा येथील नॅक मूल्यांकन प्राप्त कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दमदार सादरीकरण केले.

या विजयी पथकात प्रमुख गायिका कु. आरती संताजी जाधव हिच्यासह हर्षिता पाटील, वैष्णवी भोईर, तेजस्विनी सावंत, जतीन साळवी, सुमित जाधव यांनी सहगायन केले. ढोलकी वादनाची जबाबदारी राहुल डवले यांनी समर्थपणे सांभाळली. संपूर्ण सादरीकरणात आवाजातील ताकद, लयबद्धता आणि ऐतिहासिक संदर्भांची अचूक मांडणी यामुळे परीक्षकांनी मंडळाला प्रथम क्रमांक बहाल केला.

> **मुंबई विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन पोवाडा स्पर्धेत विद्यार्थ्यांची दिमाखदार कामगिरी**

या यशामागे प्राध्यापिका नीता भोईर यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. त्यांनी विद्यार्थ्यांना पोवाड्याची परंपरा, उच्चारांची शुद्धता आणि रंगमंचावरील आत्मविश्वास याबाबत विशेष प्रशिक्षण दिले. स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे आणि मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवींद्र कुलकर्णी यांच्या उपस्थितीत सुप्रसिद्ध लोकशाहीर यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.सलग दुसऱ्या वर्षी मिळालेल्या या यशामुळे छत्रपती शिक्षण मंडळाच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

**स्वेरीत 'स्पर्धा परीक्षांसंदर्भात प्रेरणादायी मार्गदर्शन सत्र' संपन्न**

# स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी स्वयंशिस्त आवश्यक : आयुक्त डॉ. सचिन ओंबासे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- 'अभ्यासातील कॉन्सेप्टस पूर्णपणे समजून घेऊन त्यांचे कोणत्याही भाषेत प्रभावी सादरीकरण करता आले पाहिजे. यासाठी सर्वप्रथम प्रत्येक गोष्ट मनापासून समजून घेतली पाहिजे. यासाठी इंटरनेटचा योग्य वापर केला पाहिजे. अभ्यास करताना प्रत्येक गोष्ट समजून घेतली पाहिजे तरच प्रश्नाचे उत्तर सापडते कारण सध्या स्पर्धा परीक्षा हे विद्यार्थ्यांसाठी आव्हान बनले आहे. स्वेरीतील विद्यार्थ्यांमधून शिस्त दिसून आली आणि हीच स्वयंशिस्त भविष्यात व स्पर्धा परीक्षेत यशस्वी होण्यासाठी खूप उपयोगी पडते.' असे प्रतिपादन सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त (आयएएस) डॉ. सचिन ओंबासे यांनी केले.







स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीमध्ये 'डीकोडिंग द ड्रीम्स: पाथ वे टू पब्लिक सर्विस अपॉर्च्युनीटीज' या विषयावर आयोजिलेल्या प्रेरणादायी मार्गदर्शन सत्रात सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त (आयएएस) डॉ. सचिन ओंबासे हे स्पर्धा परीक्षा संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत होते. महाराष्ट्र गीत व स्वेरी गीताने या सत्राची सुरुवात झाली. दीपप्रज्वलनानंतर स्वेरीच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता प्रा.अविनाश मोटे म्हणाले की, 'करिअर करताना आपल्याला योग्य दिशा मिळावी यासाठी स्वेरीमध्ये 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रा'ची स्थापना केली असून या केंद्राच्या माध्यमातून आज आयुक्त डॉ. ओंबासे सरांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळेल.' असे सांगून कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली. स्वेरीचे सचिव डॉ. सुरज रोंगे यांनी सर्वांचे स्वागत करून 'संस्थापक डॉ.बी. पी. रोंगे सर आणि 'स्वेरी शिक्षण संस्था' यांच्या वाटचालीतील महत्त्वाचे टप्पे, विद्यार्थ्यांच्या यशासाठी स्वेरीमध्ये होत असलेले प्रयत्न, संशोधन विभागातील प्रकल्प व मिळालेले निधी, स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून आयएएस व अशा प्रशासकीय क्षेत्रात कार्यरत असलेले विद्यार्थी, शैक्षणिक उपक्रम, प्रत्येक वर्षी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर मध्ये विद्यार्थी आघाडीवर असतात अशा विविध बाबींवर प्रकाश टाकला. पुढे बोलताना आयुक्त डॉ. ओंबासे म्हणाले की, 'सीईटी परीक्षा उत्तीर्ण करून आल्यानंतर स्वेरीमध्ये ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी या ठिकाणी येतात. यासाठी स्वेरीचे प्रथम आभार. स्वेरीही ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना योग्य दिशा दाखविण्याचे अविरत कार्य करत आहे, हे खरोखर कौतुकास्पद आहे. शिक्षण पद्धतीत अलीकडचे विद्यार्थी हुशार आहेत. माझ्या घरी देखील शैक्षणिक वातावरण असल्यामुळे स्पर्धा परीक्षेसाठी पोषक वातावरण मला मिळाले. त्यामुळे मी प्रत्येक वर्गात प्रथम क्रमांक मिळवत होतो. त्यामुळे स्पर्धा परीक्षा देखील अवघड गेली नाही. आता मात्र यूपीएससीचे नियम बदलले असून आज यूपीएससी आणि एमपीएससी अशा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढावी या हेतूने अभ्यासक्रम समान ठेवला आहे. यासाठी पदवी व त्यानंतरचा अभ्यासक्रम या परीक्षेसाठी असतो. अभियांत्रिकी, फार्मसी व वैद्यकीय अभ्यास यामध्ये असतो. अभ्यासक्रमात इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, नागरिकशास्त्र, सामान्य शास्त्र हे प्रीलियम परीक्षेत विषय अभ्यासक्रम असतात. तरीही अवघड समजल्या जाणाऱ्या या स्पर्धा परीक्षेसाठी भारतातून पाच ते १० लाख विद्यार्थी परीक्षा देतात. त्यातून पाच ते दहा हजार जण उत्तीर्ण होतात. यासाठी सातत्याने परिश्रम करणे आवश्यक आहे. स्पर्धा परीक्षा देताना नियोजनात्मक अभ्यासासाठी वेळ द्यावा लागतो. इंजिनिअरिंग झाल्यावर प्रथम जॉब करावा त्यानंतर दोन तीन वर्षांनी स्पर्धा परीक्षा द्यावी. अनुभव न घेता जर परीक्षेला सामोरे गेले तर काही समजणार नाही. यासाठी प्रथम स्पर्धा परीक्षेची कन्सेप्ट पूर्णपणे समजून घ्या. कारण २० ते २३ हे वय वर्षे ऊर्जा देणारे आहे. त्यामुळे करिअर करण्यासाठी हीच योग्य वेळ आहे. कोणीतरी सांगतय म्हणून स्पर्धा परीक्षा देवू नका. या स्पर्धेच्या युगामध्ये सेल्फ मोटिवेशन अत्यंत आवश्यक आहे. ज्ञानदीप ॲक्डमीचे ॲड. महेश शिंदे म्हणाले की, 'स्पर्धा परीक्षा आव्हानात्मक असताना परीक्षेला बसणाऱ्यांची संख्या व शेवटी यशस्वी होणाऱ्यांची संख्या यात फार मोठा फरक आढळतो. सध्याच्या युगात तक्रार करण्याचा स्वभाव बनलेला आहे. त्यात वेळ वाया जात आहे. म्हणून जीवनात मोठे व्हायचे असेल तर आत्ताच कम्प्लेंट करणे थांबवा. माणसं मोठी झाली की समाज मोठा होतो, श्रीमंती आली की लोक आंधळे होऊ लागतात यासाठी योग्य ठिकाणी डोकं लावणे आवश्यक असते. म्हणून व्हीजन मध्ये क्लिएरिटी हवी आणि आरोगन्स टाळा हे महत्त्वाचे तीन कानमंत्र ॲड. शिंदे यांनी दिले. वैभव खूपसे म्हणाले की, 'ज्ञानदीप ॲक्डमीच्या माध्यमातून स्वेरीच्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी सर्वोतोपरी मदत केली जाईल आणि विशेष म्हणजे डॉ. सचिन ओंबासे यांच्या नावाने शिष्यवृत्ती सुरु करणार आहे.' अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी श्रीकांत जाधव, शिंदे, विनोद आसबे, स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा.सतीश मांडवे, अभियांत्रिकीच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग, डिप्लोमाच्या विद्यार्थिनी प्रतिनिधी वैष्णवी नवले, संस्थेअंतर्गत असलेल्या पाचही महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. ज्ञानेश्वर मिटकरी, सोनाली कांबळे आणि डॉ. नीता तळवलकर यांनी सूत्रसंचालन केले तर इंजिनिअरिंगच्या स्टुडंट कौन्सिलच्या सचिवा नेहा झिरपे यांनी आभार मानले.

१.आयुक्त डॉ.ओंबासे यांनी आयआरएस.,आयपीएस व आयएएस या तिन्ही परीक्षा दिल्या. तिन्ही महत्वाच्या स्पर्धा परीक्षेमध्ये त्यांनी कसे यश मिळविले याबद्दल विद्यार्थ्यांनी माहिती जाणून घेतली.

२. 'अभियंत्यांनी साकारली ज्ञानाची पंढरी....' हे स्वतःचे गीत असणारे राज्यातील एकमेव स्वेरी संस्था आहे.' असे सांगून ड. शिंदे यांनी स्वेरीतील विद्यार्थ्यांमधील शिस्तीचा गौरव केला.

३. यावेळी इंजिनिअरिंग व फार्मसीच्या डिप्लोमा व डिग्री मधील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा बाबत सविस्तर प्रश्न विचारले असता डॉ. ओंबासे यांनी त्यांची समाधानकारक उत्तरे दिली.